खटला दाखल तारीख – २१/०४/२०२५
खटला नोंदणी तारीख – २१/०४/२०२५
निकाल तारीख – १८/०६/२०२६
कालावधी – वर्षे महिने दिवस
०१ ०१ २८

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ यांचे न्यायालयात**
**ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग.**

(पीठासीन अधिकारी एन.ए.बकरे)
(अधिघोषित दिनांक – १८/०६/२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५३ सन २०२५**
**निशाणी क्र.७ लगत**

प्रथम खबर अहवाल गुन्हा क्र.५७/२०२५
दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ क्र.०२

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे<br>दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ क्र.०२ |
| सहाय्यक सरकारी अभियोक्ता | श्रीम. एस. एस. पाटील |
| आरोपी | प्रकाश प्रभाकर सडवेलकर,<br>वय– ६७ वर्षे, व्यवसाय– शेती,<br>रा. नेरुर चव्हाटा, देऊळवाडी, घर नं.६०५,<br>ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. |
| आरोपी तर्फे विधिज्ञ | श्री.आर.डी.बिले |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ०५/०३/२०२५ |
| प्रथम खबर अहवालाची तारीख | ०५/०३/२०२५ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | २१/०४/२०२५ |
| गुन्ह्याचा दोषारोप नोंदवल्याची तारीख | १६/०१/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | २७/०४/२०२६ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखून ठेवण्याची तारीख | निरंक |
| न्यायनिर्णय तारीख | १८/०६/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याची तारीख, असल्यास | निरंक |

## <u>आरोपीची माहिती</u>

| आरोपीचा क्र. | आरोपीचे नाव | आरोपीच्या अटकेची तारीख | आरोपीची जामीनावर मुक्तता झाल्याची तारीख | आरोपी विरुध्द निश्चित करण्यात आलेले गुन्हे | आरोपीची निर्दोष मुक्तता अथवा दोषी ठरविण्यात आले | आरोपीस सुनावण्यात आलेली शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी बी.एन.एस.एस. चे कलम ४६८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रकाश प्रभाकर सडवेलकर | बी.एन.एस.एस.२०२३ चे कलम ३५(३)(६) अन्वये नोटीस | २०/१२/२०२५ | महाराष्ट्र दारुबंदी अधि. ६५(ई) अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

**भाग 'क'**

**अ. सरकारीपक्षाच्या साक्षीदारांची यादी/बचाव/न्यायालयाचे साक्षीदार**

**२.** याकामी अभियोगपक्षाने आरोपी विरूध्द दोषारोप शाबीत करण्याकरीता खालीलप्रमाणे दोन साक्षीदार तपासलेले आहेत.

| साक्षीदार क्रमांक | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराच्या पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | नंदकुमार प्रकाश राणे | फिर्यादी |
| २. | मुकुंद रावजी तारी | पंच साक्षीदार |

**अभियोगपक्ष निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :-**

| **अनुक्रमांक** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.पी-१/पीडब्ल्यू-१ | फिर्याद |
| २. | नि.क्र.पी.-२/पीडब्ल्यू-२ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीपुरते |

**ब) बचाव पक्ष :-**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :-**

| **अनु.क्र.** | **निशाणी नंबर** | **निशाणी नंबरचे स्वरुप** |
|---|---|---|
| १ | ७ | आरोपीचे प्रतिकथन |
| २ | ७ लगत | आरोपीची जबानी भा.ना.सु.सं.कलम ३५१ (१)(ब) प्रमाणे |

**ड) मुद्देमाल तपशील :-**

| **अनु.क्र.** | **मुद्देमाल क्रमांक** | **मुद्देमालाचे स्वरुप** |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**-: न्यायनिर्णय :-**

**( दिनांक १८ जुन, २०२६ रोजी घोषीत केला )**

**३.** प्रकरणातील सर्व परिस्थिती, उपलब्ध पुरावा आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद यावरुन खालील वादप्रश्न माझे विचारार्थ निघतात. त्यांचे निष्कर्ष व त्यावरील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे नमुद करीत आहे.

| अ.क्र | वादप्रश्न | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक ०५/०३/२०२५ रोजी गाव मौजे नेरुर चव्हाटा, देऊळवाडी, ता. कुडाळ येथे आरोपी घर नं.६०५ च्या मागील बाजूस एका सावाच्या गोणीमध्ये गोवा बनावटी दारुच्या नॅशनल डॉक्टर ब्रॅन्डच्या १८० मि.ली. मापाच्या एकुण २१ सिलबंद प्लॅस्टीक बाटल्या विनापरवाना ताब्यात बाळगताना मिळून आला आणि त्यायोगे आरोपीने महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमचे कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष शाबीत करतो काय ? | **नकारार्थी** |
| २. | अंतिम आदेश काय ? | **आरोपीस निर्दोष मुक्त करणेत येत आहे.** |

**<u>-:: कारणमिमांसा ::-</u>**

**<u>वादप्रश्न क्र.१ व २ करीता</u> –**

**४.** आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा तोहमत आहे.

**कलम ६५(ई) प्रमाणे–** *जी कोणी व्यक्ती या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा तद्न्वये केलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा विनियमाचे तद्न्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाचे अथवा तद्न्वये दिलेल्या कोणत्याही लायसन्सचे, पासाचे, परवान्याचे किंवा प्रधिकार पत्राचे उल्लंघन करुन कोणतेही मादक द्रव्य (अफू व्यतिरिक्त) विकेल अथवा विकत घेईल अथवा बाळगेल त्यास सिध्दपराध ठरविण्यात आल्यावर अशा प्रत्येक अपराधाबद्दल शिक्षा होईल.*

**५.** अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले फिर्यादी नंदकुमार प्रकाश राणे (स.सा.क्र.१) यांनी आपल्या सरतपासात असे कथन केले आहे की, 'दि.०५/०३/२०२५ रोजी ते दुय्यम निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, कुडाळ क्र.०२ येथे कार्यरत असताना त्यांना गांव

मौजे नेरुर चव्हाटावाडी येथे छापा टाकणेबाबत दुय्यम निरीक्षक यांनी सांगितले होते. मिळालेल्या माहितीनुसार ते स्वतः, दुय्यम निरीक्षक, पंच व इतर स्टाफ असे सर्वजण घटनास्थळी जाऊन छापा घातला असता, घटनास्थळी आरोपीच्या ताब्यामध्ये एका कापडी पिशवीत १८० मि.ली. मापाच्या गोवा बनावटीच्या नॅशनल डॉक्टर ब्रॅन्ड असे लेबल असलेल्या २१ सिलबंद बाटल्या मिळून आल्या. मिळून आलेल्या मुद्देमालातून दोन १८० मि.ली. मापाच्या सिलबंद बाटल्या नमुना पृथ्थःकरणासाठी बाजूला काढून उर्वरीत मुद्देमालाचा पंचनामा केला. त्यानंतर त्यांनी आरोपीविरुध्द दारुबंदी गुन्ह्याअंतर्गत निशाणी क्र. पी–१/पीडब्ल्यू–१ वरील फिर्याद दाखल केली.' सदर साक्षीदाराचे पुराव्यातून अभियोगपक्षाने फिर्याद (निशाण क्रमांक पी–१/पीडब्ल्यू–१) शाबीत केली.

६. बचाव पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात फिर्यादी यांनी घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असुन आजुबाजूला घरे व दुकाने आहेत. प्रस्तुत कामातील पंच हे स्थानिक नसून, ते त्यांचे नेहमीचेच पंच आहेत. जप्त मुद्देमालाचे पुढे काय झाले हे त्यांना सांगता आलेले नाही. तसेच जप्त मुद्देमाल आजरोजी न्यायालयासमोर हजर नाही, असे कबुल केले आहे.

७. अभियोग पक्षाने जप्ती पंचनाम्यावर पंच साक्षीदार क्र.२ मुकुंद रावजी तारी यांना तपासले आहे. सदर साक्षीदाराने अभियोग पक्षास सहकार्य केले नसल्यामुळे त्यास उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले. परंतू, सदर साक्षीदाराच्या उलटतपासातदेखील आरोपीविरुध्दचा गुन्हा शाबीत करणारी कोणतीही कथने आली नाहीत. सदरील जप्ती पंचनामा शाबीत करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरलेला आहे.

८. प्रस्तुत कामामध्ये अभियोगपक्षाने रासायनिक पृथ्थकरण अहवाल निशाणी क्र.९ वर

सादर केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता, त्यामध्ये ३०.३५% v/v इतके इथाईल अल्कोहोल असल्याचे नमुद आहे. परंतु, अभियोग पक्षाने रासायनिक पृथक्करणाकरीता पाठविणेत आलेले द्रव्य हे आरोपीचे ताब्यातून जप्त करणेत आलेले होते, ही बाब निःसंशयपणे सिध्द करणेस अभियोगपक्ष अपयशी ठरलेला आहे. तसेच प्रस्तुतकामी अभियोग पक्षाने कॅरिअर तसेच तपासी अंमलदार यांना तपासलेले नाही. मुलतः अभियोग पक्षाने जप्ती पंचनामा निःसंशयपणे सिध्द केलेला नसल्यामुळे या कामी दाखल झालेला रासायनिक पृथक्करण अहवाल आरोपीचे दोषत्व सिध्द करणेस पुरेसा व माफक पुरावा होणारा नाही.

९. न्यायालयासमोर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. प्रकरणात पंच मुकुंद रावजी तारी (स.सा.क्र.२) या पंच साक्षीदाराने सरकारपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा योग्यप्रकारे शाबीत झालेला नाही. फिर्यादी नंदकुमार प्रकाश राणे (स.सा.क्र.१) यांनी जरी सरतपासात घटनेबाबत कथन केलेले असले तरी पंच साक्षीदार यांनी अभियोगपक्षाला सहकार्य केले नसल्यामुळे आरोपीच्या ताब्यात गोवा बनावटीची दारू मिळून आली ही बाब ठोस पुराव्यानिशी शाबीत होत नाही. तसेच नेरुर चव्हाटा, देऊळवाडी हे लोकवस्तीचे ठिकाण असताना अभियोगपक्षाने प्रकरणात एकाही स्वतंत्र साक्षीदाराचे टिपण नोंदविलेले नाही. त्यामुळे केवळ पोलीस साक्षीदारांच्या जबाबावर विसंबून आरोपीने सदरचा गुन्हा केला आहे, असे गृहीत धरणे न्यायहितार्थ योग्य होणार नाही. आरोपी विरुध्द दोषारोप शाबीत करण्याइतपत सबळ पुरावा याकामी अभियोगपक्षाने न्यायालयासमोर आणलेला नाही. आरोपीची सबळ पुराव्याअभावी सदर गुन्ह्यातून मुक्तता करणे योग्य वाटते. सबब, मी वादप्रश्न क्र.१ चे उत्तर **"नकारार्थी"** देऊन वादप्रश्न क्र.२ च्या उत्तरादाखल पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**–: <u>आ दे श</u> :–**

१. आरोपी प्रकाश प्रभाकर सडवेलकर याची भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम २७८ (१) नुसार महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई) खाली शिक्षापात्र असलेल्या आरोपातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे वैयक्तिक बंधपत्र व जामीनदाराचा जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३. दोषारोपपत्रात नमूद जप्त मुद्देमाल अपिल कालावधीनंतर नियमानुसार नाश करण्यासाठी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क कार्यालय सिंधुदुर्ग यांच्याकडे पाठविण्यात यावा.

४. या न्यायनिर्णयाविरुध्द अपिल झाल्यास अपिलीय न्यायालयात हजर राहण्यासाठी आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ मधील कलम ४८१ प्रमाणे रुपये १५,०००/– चा वैयक्तिक जातमुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात निवेदीत व उद्घोषीत केला.)

सही

(एन.ए.बकरे)

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कुडाळ.

ठिकाण – कुडाळ.

दिनांक – १८.०६.२०२६